वशिला लावला पाहिजे तर ती किल्ली हस्तगत करतां येईल आणि संतांकडे वशिला पैशाचा लागत नाहीं बरं का ! त्यांना पाहिजे असतं तुमचं शुद्ध, सात्विक, निःस्वार्थी प्रेम ! फार कठीण गोष्ट आहे ज्ञानदीप पेटवणं म्हणजे ! परंतु ती अशक्य मात्र बिलकूल नाहीं. पृथ्वीवर वावरणाऱ्या प्रत्येक मनुष्य प्राण्याला ती शक्य आहे.' कारण मनुष्य उपजतच ज्ञानी आहे. फक्त तें ज्ञान ओळखून काढतां आलें पाहिजे आणि त्यासाठीं सर्व सिद्धता करून ज्ञानदीप पेटवला पाहिजे. मग एवढें झाल्यानंतर आत्मशक्तीचा प्रत्यय येईल. हृदय निसर्गाशीं एकरूप होईल, व्यक्तीचा ईश्वर होईल व ' नर करणि करे तो नरका नारायण बन जाय ' ! हें संत कबिराचें म्हणजे कृतार्थ ठरेल.

प्रमोद गव्हाणकर

---

॥ श्री साईबाबा प्रसन्न ॥

## विनंति

( १ ) यापुढें भक्तांनीं जें कांहीं पाठविणें तें सरकारकून शिर्डी संस्थान ऑफ श्री साईबाबा, शिर्डी, पोस्ट रहाते, जिल्हा अहमदनगर या पत्त्यावर पाठवीत जावें म्हणजे त्यांस पावत्या व प्रसाद वेळींच मिळेल. संस्थानचे ट्रस्टीज व चिटणीस यांचे नांवें पाठवूं नये.

( २ ) धर्मकृत्यें, वार्षिक वर्गणी अगर इतर कोणत्याहि फंडाकरितां पोस्टानें पैसे पाठवितांना मनिऑर्डर कूपनमध्यें आपलें नांव, पत्ता व ज्या कारणास्तव पैसे पाठविले ते स्पष्ट नमूद करावे. जर नमूद नसेल तर कमिटीच्या इच्छेप्रमाणें जमा कले जातील ( सभासदांच्या पत्त्यावर नंबर असतो तो नंबर वार्षिक वर्गणी भरतांना जरूर द्यावा. ) व त्याबद्दल कोठल्याही तऱ्हेनें तक्रार चालणार नाहीं.

( ५ ) साईबाबांचा भक्तगण फार वाढला आहे व बहुतेक ठिकाणीं साईसंस्था स्थापन झाल्या आहेत त्यांचा शिर्डी संस्थानशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं व शिर्डी संस्थानकरितां पैसे गोळा करण्यास कोणीही एजंट नाहींत. जें कोणास खास शिर्डी संस्थानकरितां पाठविणें असेल तर सरकारकून याजकडे पाठवावें. **चेकवर शिर्डी संस्थान ऑफ श्री साईबाबा असें लिहावें व क्रॉस करून पेईज अकाउंट म्हणून जरूर लिहावें.** रिसिट संबंधानें जर कम्प्लेट करणें असेल तर ऑ. खजिनदार किंवा सरकारकून यांजकडे न करितां ऑ. चिटणीस यांजकडे करावी.

१०५ जे. ताराबाग,<br>लव्हलेन मुंबई, १०

द. बा. राणे.<br>ऑ. चिटणीस

॥ श्री साई ॥

# वाक्तुषार

—★—

असत्याच्या, ढोंगाच्या, लबाडीच्या व लुच्चेपणाच्या पायांवर उभारलेल्या इमारती टिकावू होत नसतात. (स्वामी विवेकानन्द)

—★—

अद्भिर्गात्राणि शुध्यन्ति, मनःसत्येन शुद्धति ॥ विद्या तपोभ्यां भूतात्मा, बुद्धिर्ज्ञानेन शुद्धति ॥

म्हणजे;

शरीर पाण्यानें शुद्ध होतें। मन सत्यानें शुद्ध होते। जिवात्मा विद्या व तप यांच्या योगानें शुद्ध होतो। व बुद्धि ज्ञानानें शुद्ध होते ॥ (मनुस्मृति)

—★—

आचार हीनस्य तु ब्राह्मणस्य। वेदा षडङ्गास्त्व खिलाः सयज्ञा॥

म्हणजे, ज्याचें आचरण शुद्ध नाहीं, त्यानें षडंगांसहीत जरी वेदाचें अध्ययन केलें, तरी तो त्यानें पुनीत होत नाहीं. (मनुस्मृति)

—★—

पिंड ब्रह्मांडी सकळ ठाईं। त्याजवीण सत्ता आणिकाची नाहीं॥
आपआपणांतें समजोनी घेई। उपदेश नाहीं या परता॥ (भक्तलीलामृत)

—★—

कपाळींची रेखा असती उत्तम। तरी का हा श्रम पावतो मी॥ (तुकोबाराय)

—★—

तुका म्हणे मना धरी रे संत संगती सोई। नलगे कांहीं करावें राहे विठ्ठलपायीं॥

—★—

सुखदुःखाचें कारण। मनचि हे अधिष्ठान॥ (जनार्दन महाराज)

—★—

योग मार्ग बहुत कठीण । विरळा साधी लक्षांतून ॥
भाळ्या भोळ्या सकळा कारण । नामची पावन करितसे ॥ (भक्तलीलामृत)

—★—

स्त्रीयांचा तो धर्म करी पतिसेवा । नलगे दुजा गोवा तिर्थयात्रा ॥

—★—

बीज होय तैशी फळें, तैथें दुजें काय मिळे । भाव असे तैशी भक्ति, तैशी फळाची प्रचिति ॥ ( शिवदास )

—★—

तरी अभ्यासाविण कांहीं । निश्चयाविणें प्राप्त नाहीं । गुरुवचनीं विश्वासतोही । दृढ असावा निश्चित ॥

—★—

ऐसी भक्तिकर घटभीतर छोड कपट चतुराई । सेवाबंदी और अधिनता सहज मिली रघुराई ॥ हरिसे लागी रहोरे भाई ॥

—★—

जन्मना जायते शूद्रः । संस्कारैर्द्विज उच्चते ॥
कर्मणायाति विप्रत्वं । ब्रह्मजानाति ब्राह्मणः ॥ ( मनुस्मृति )

—★—

कुणाची जगीं पुत्र कन्या कलत्र । मनीं तूं विचारी कुणाहाती सुत्र ॥
जगीं खेळण्या घातलों देहधारी । प्रभु खेळवी आपणां सुत्रधारी ॥ ( समर्थ )

—★—

देवा ऐसे देवची होती । जे या भजती विठ्ठला ॥ ( निळोबा महाराज )

—★—

तुका म्हणे भाव शुद्ध हें कारण । भाट नारायण होईल त्याचा ॥ (तुकोबाराय)

—★—

बकाचिये परी ध्यान नको धरूं । जीवें भावें धरूं संत चरण ॥
ध्यानाचें ध्यान संतांचें चरण । काया, वाचा, मन दृढ ठेवीं ॥ (एकनाथमहाराज)

—★—

मेघा परिस उदार संत मनोगत पुरविति । आलिया शरण मनें वाचा
चालविती त्याचा भार सर्व ॥ (एकनाथ)

—★—

हरिका नाम सुमरले निशिदिनी दिलसे नहीं विसार ।
ब्रह्मानन्द कटे भवबंधन छुटे छुटे सकल विकार ॥ (ब्रह्मानन्द)

—★—

जगांत लीनतेनें चालणारे, व मूर्खांची बडबड शांतपणें ऐकून घेणारेच, परमेश्वराचे खरे सेवक होत. (पवित्र कुराण)

—★—

मानवाची सेवा ही परमेश्वराची सर्व श्रेष्ठ भक्ति होय. (हजरत महंमद पैगंबर)

—★—

सत्यापासून त्रास झाला तरी सत्य सोडूं नका आणि असत्यापासून फायदा होतो म्हणून असत्याचें अवलंबन करूं नका. (हजरत महंमद पैगंबर)

बाबांचा बाच्या

२-५-५१

# शिर्डी-वृत्त

## मार्च १९५१

नेहमींप्रमाणें या महिन्यांतही श्रींच्या दर्शनास बाहेरगांवचे व आजुबाजूच्या गांवांतील पुष्कळ लोक येऊन गेले.

**देणगी:**—या महिन्यांत श्रींच्या भक्तांकडून एकूण ४२ जिन्नस श्रीसंस्थानास भेटीदाखल आले.

**धर्मकृत्य:**—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, आरती, सुवासिनी भोजन व अन्नदान वगैरे भक्तांचे विधी संस्थानतर्फे नेहमींप्रमाणें करण्यांत आले. दहा भक्तांनीं मंदिरांत श्रीसत्यनारायणाच्या पूजा घातल्या.

**कीर्तन:**—माघ व॥ ९, श्रीरामदास नवमीप्रीत्यर्थ कीर्तन, माघ व०॥ ११, महाशिवरात्र फा० शु०॥ ११, श्री तुकाराम बीज अशी पांच कीर्तनें श्रीमंदिरांत करण्यांत आलीं.

**नवल विशेष:**—महाशिवरात्रीनिमित्त श्रींचे दर्शनास अलोट गर्दी लोटली होती. त्या दिवशीं श्रींचे समाधीस मंगलस्नान घालण्यांत येऊन रात्रौ पालखीची मिरवणूक काढण्यांत आली. कीर्तनाचा कार्यक्रमही उत्तमप्रकारें पार पडला.

या महिन्यांत खालील कलाकार मंडळीचे कार्यक्रम झाले.

श्री. डॉ. **एस. व्ही. भट**, पुणें ( गायन )
श्री. **दामुअण्णा**, बेलापूर ( सनई वादन )
कु. **कुमूद मंगळूर**, मुंबई ( नृत्य-भजन )
श्री. **एस. व्ही. ऊर्फ काका परब**, मुंबई ( गायन-भजन )
श्री. **कृष्णराव वऱ्हाडकर**, मुंबई ( गायन )
श्री. **राधाकृष्ण परब**, मुंबई ( गायन )
श्री. **वसंत नेरकर**, पुणें ( गायन )
श्रीमती **कलाबाई**, जेजुरी ( संगीत भजन )
श्री. **बाळाजी गोपाळराव चौघुले**, मुंबई ( गायन )
श्री. **नहरबुवा व्यास**, पुणें ( गायन )
श्री. **जी. एस. जगताप**, रेडिओस्टार पुणें ( गायन )

सभामंडप बांधकाम व इतर साफसफाईचीं कामें चालू असून सभामंडप पूर्ण होत आला आहे. शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

# श्री साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत | | |
|---|---|---|---|---|
| | | रु. | आ. | पै. |
| १ | श्री साई सच्चरित्र ( मराठी ) .... .... | ७ | ० | ० |
| २ | सच्चरित्र ( इंग्रजी ) .... .... | ४ | ० | ० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी .... | ० | २ | ० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] .... | ० | ८ | ० |
| ५ | सगुणोपासना .... .... .... | ० | ३ | ० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक ( इंग्रजी ) .... .... | १ | ४ | ० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

मॅनेजर, शिरडी संस्थान, मु. शिरडी, पो. रहातें, जि. अहमदनगर
खजिनदार, त्रि. शा. कीर्तिकर, २१३, धन बिल्डिंग, चर्नीरोड, मुंबई नं. ४

---

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादक :—डॉ. के. भ. गव्हाणकर यांनीं, काळाचौकी रोड,
मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.
मुद्रक :—के. एन्. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्युडेक्स बिल्डिंग,
त्रिभुवन रोड, मुंबई ४

अंक ३ रा ] [ वर्ष २८ वें.

# "श्री साईलीला"

त्रैमासिक



वार्षिक वर्गणी रु. २-४-०

# श्री साईलीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ।
प्रादूर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २८ ] त्रैमासिक–जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर १९५१ [ अंक ३ रा

## —: संपादकीय :—

### "साई"

संतशिरोमणी सद्गुरु साईभगवान् सकल संतांची माऊली आहे. "साई, साई" म्हणतांच समाधान व आनंद प्राप्त होतो. कारण त्या शब्दांतच प्रियता भरलेली आहे. जीवीचा जिव्हाळा, मातृवात्सल्य त्यांत ओतप्रोत भरलेलें आहे. जिवाची प्रवृत्ती सारखी विश्वाकडे वहात असते व त्याच्या इंद्रियांची ओढ सारखी विषयाकडे असते. या कारणास्तव शब्दाबरोबर शब्दाचें ठिकाण जो आनंद त्याची ओळख होत नाहीं, म्हणून साई समजत नाहीं व उमजत नाहीं. थोडक्यांत, साई हें परब्रह्म आहे. भक्तांच्या भक्तीला भुलून हा "गणेश विठ्ठल–साई" रुपानें आकारास आलेला आहे.

कलीयुगांत स्वैरपणें वागून मनुष्य विषयभोगाच्या चिंतनांत मग्न झाला तर त्याला मनुष्यपणास मुकावें लागेल. याकरतांच मनुष्याला प्राप्त झालेल्या नरदेहाचें सार्थक करण्याकरतांच त्याला मार्गदर्शक संत होतात.

आजपावेतों बऱ्याच विद्वान पंडित व शास्त्री लोकांनीं बाबांच्या हयातीपासून तों आतांपर्यंत साईबाबा व शिरडी यांचें निरनिराळ्या तऱ्हेनें संशोधन केलें. शिरडींत असणाऱ्या मशिदीला, ज्यामध्यें बाबांनीं अखंड वास्तव्य करून समाधीस्त होईपर्यंत कृष्णलीला व रामलीला केल्या, त्या मशिदीला बाबा स्वतः द्वारकावती, द्वारावती अथवा मशीदमाई म्हणून संबोधीत. बाबा हिला द्वारकावती कां म्हणत असत याचें पूर्ण संशोधन कै. देव मामलेदार ठाणें (बाबांचें बाळ) यांनीं केलें. (साईलीला अंक १ ते ४ सन १९४९) परंतु त्यांना अगर इतरेजनांना बाबांच्या स्वतःच्या भूमिकेचा अगर त्यांच्या मातापित्यांचा वा नातलगांचा पत्ता लागला नाहीं व अद्यापही लागत नाहीं.

साई याचा अर्थ व्यापक आहे व तो समजण्याला जीव, जगत् व जनार्दन हे समजले पाहिजे.

**॥ देवाचे हे आत्मे ते हे जाणावे संत ॥**
**॥ त्यांचे पदीं व्हावें रत सदा दृढ ॥**
**॥ तुका म्हणे संत सुखाचे विभागी ॥**
**॥ आनंद जगीं साधू रूपें ॥**

**जनार्दन**—ज्याला शास्त्रानें ब्रह्म म्हटलें आहे, त्याचें वर्णन श्रुतीनें "**नेति, नेति**" केलें आहे. तें निर्गुण आहे. निराकार आहे. मनोवाचातीत आहे; बुद्धीची दृष्टी पोंचत नाहीं या म्हणण्यावरून ब्रह्मस्वरूपाचा चांगला बोध होत नाहीं. परंतु संतशिरोमणि श्री तुकाराम महाराज म्हणतात.

अणुरेणु पांती ब्रह्मांडाचीया पोटी
ज्ञानाचीये पोटीं दिसे जया
ऐसी पवित्रता बोलतसे गीता
ज्ञानाच्या अनंता भेद नाहीं
तुका म्हणे ज्ञान तोचि नारायण
जाणती सज्ञान गुरुपुत्र

आणखी ते म्हणतात—

ज्ञानाचे प्रकाशे वर्तती सकळ
न येती बरळ देहबुद्धी ॥

ज्या ज्ञानाच्या प्रकाशांत ब्रह्मस्वरूप काय आहे हें समजून घेऊन त्याच्याशीं तादात्म्य करतां येतें तें ज्ञानच ब्रह्म होय.

मनांतील व जगांतील क्रिया ज्या ज्ञानाच्या योगें कळतात तें ज्ञान क्रियारूपानेंच प्रगट झालें आहे. हें ज्ञान जगांत अनंत रूपानें व्यक्त होऊन स्वतःचा आनंद अनंत क्रियांनीं क्रीडा करून भोगत आहे.

नकळे याची गती नकळे याची लीला ।
आपोआप सोहळा भोगीताहे ॥

अर्थात ज्ञानाला स्वतःची प्रतीति घेण्याकरितां दुसऱ्याचा आश्रय घ्यावा लागतो. जसें, स्वतःच्या मुखाची प्रतीति आरशांत पाहिल्याशिवाय होत नाहीं. ज्ञानाला आपला आनंद क्षणोक्षणीं प्रगट करण्याची अनिवार इच्छा असते व जें अनंत क्रियांनीं व रुपांनीं सारखें उल्हसित होऊन त्यायोगें आनंद उपभोगीत असतें.

ज्ञातृज्ञेयाविहीन । नुसधेंची ज्ञान ।
सुखा भरलें गगन गाळीव जें ॥

(ज्ञानेश्वरी अ. १५ ओ. ७७)

**ज्ञातृ**–जाणणारा व **ज्ञेय**=जाणण्याची वस्तु या दोहोंचें जें अधिष्ठान व जें या दोघांना प्रकाशित करतें व या दोहोंचे सहाय्यानें जें प्रकाशित होतें तें ज्ञान म्हणजेच ब्रह्म होय. हें ज्ञान केवळ शुद्ध, निर्मळ निरंतर आनंदरूपच आहे त्यास ज्ञानानंद व ब्रह्मानंद म्हणतात.

ब्रह्मानंदं परम सुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ।

ज्ञानानंद हा स्फुरद्रूप आहे व तो व्यक्त होण्यास सारखा धडपडत असतो. तो स्वतःचा आनंद ज्ञेय रूपानें प्रकाशित करून आपल्या ज्ञातृत्वशक्तीनें लुटत असतो. ज्ञानानंदाचें ज्ञेयरूप तें जगत् व ज्ञातृत्वशक्ती तो जीव.

.जनार्दन जीवाच्याद्वारा जगांतील आपली प्रतीति सारखी घेत आहे.

आनंदाचे डोही आनंद तरंग ।
आनंदाचे अंग आनंदची ॥

(तुकाराम)

आनंद व स्वानंद हा स्फुरद्रूप आहे व ज्ञानानंद हा स्वसंवेद्य आहे. आनंदाचें ज्ञान (अव्यक्त) ज्ञानाचें स्फुरण ज्ञातृत्व (व्यक्त) याचा प्रकाश चित्ताच्या ठिकाणीं असल्यामुळें त्यास चिदाकाश म्हणतात. चिदाकाशाचें स्फुरण महदाकाश–सूक्ष्म चिदाकाशाचें स्थूल रूप–महदाकाशाचें स्फुरण वायु, वायूचें तेज, तेजाचें आप व आपाचें स्फुरण पृथ्वी याप्रमाणें आनंदाचें स्फुरण हेंच विश्वाचें जनन होय.

ज्ञान ज्ञातृत्वांत येऊन ज्ञेय अथवा दृश्य रूपानें व्यक्त होण्यापूर्वी सत्तारूपानें जें असतें तें ब्रह्म. यावरून ब्रह्म काय आहे हें लक्षांत आलें. ज्ञानाचे ठिकाणीं जें ज्ञातृत्व आहे त्याचें नांव जीव. म्हणजे ज्ञानसत्तेचा प्रकाश तो जीव. ज्याप्रमाणें सूर्याच्या ठिकाणीं प्रभा, अग्नीच्या ठिकाणीं दाहकत्व, पाण्याच्या ठिकाणीं द्रावकत्व त्याप्रमाणें ब्रह्माच्या प्रगट ज्ञानाच्या ठिकाणीं जें ज्ञातृत्व त्याचें नांव जीव.

ब्रह्म निर्गुण आहे–ज्ञातृज्ञेयाविहीन आहे. जीव सगुण आहे ज्ञातृज्ञेयरूप आहे.

निर्गुणपणें उभा सगुणपणें शोभा ।
जीव शीव प्रभा दावितांहे ॥ ज्ञा.

सत्ता मात्र ज्ञान ज्यावेळेस पूर्ण सत्तेनें प्रगट होतें तेव्हां देवाचा अवतार झाला असें म्हणतात. विश्वांतील दिसणाऱ्या नानातऱ्हेच्या रंगाचे, आकाराचे पदार्थ अगर वस्तु म्हणजे ज्ञानस्वरूपावर उठणारे कल्पनांचे तरंग होत. ज्ञानसत्तेची व ज्ञानाच्या व्यक्तरूप जगताची जाणीव ही जेव्हां सगुणरूपानें आकारास येते तेव्हां जीवात्मा जन्मास आला असें म्हणतात व देव व भक्त, ज्ञान व ज्ञातृत्त्व, जीव व जगत् याठायीं सतत निरामय खेळणारी आनंदवृत्ती जगतांत देह धारण करते तेव्हां संतांचा अवतार होतो.

संत हे स्वानंद प्रतीतीचे पुतळे होत.

आनंद हा पदार्थ व क्रिया या दोहोंकडून प्रगट केला जातो परंतु जिवाला वाटतें विषय व क्रिया ह्यांतून आनंद निवत असतो. संतांची दृष्टी आनंदावर असते म्हणून ती सम आहे. उलट जिवाची दृष्टी विषयावर खिळलेली असते. भोगदृष्टी आहे म्हणून त्यांना विषयाबरोबर असणारें सुखदुःख अनुभवास येतें. आपण आपल्या ज्ञानानेंच हिरा पारखून घेतों. पण हिरा प्राप्त झाल्यावर आपल्याला त्या हिऱ्याचें महत्त्व वाटतें व प्राप्त करून देणाऱ्या ज्ञानाचें विस्मरण होतें. याचप्रमाणें संसारांत विषयीजनांची स्थिति होते.

जीव हा परब्रह्माचा अवतार आहे. त्याच्या गुणाचा बोध जिवाच्या गुणावरून स्पष्ट होतो. जिवाला मरणाची भीति वाटते म्हणजे जिवाचें नित्य असणारें अमरत्व प्रगट होतें. जिवाला हें समजत नाहीं. उमजत नाहीं. शब्दाबरोबर शब्दाचे ठिकाण जो आनंद त्याची ओळख नाहीं म्हणून साई समजत नाहीं.

साई = स + आई. स = ज्ञानसत्ता; आई = ज्ञातृत्वांत येऊन साई–ज्ञेय रुपानें प्रगट झाली. अर्थात् साई स्वानंदाचें प्रतिक पूर्णब्रह्म.

विषयदृष्टींत पदार्थ हा इंद्रियांचा भोग पुरविणारा असा भोग्यरूप दिसतो तर चैतन्यदृष्टींत पदार्थ हरीचे आनंद दाखविणारी त्याची प्रेमखूण असा दिसतो.

वाफेमध्यें अतर्क्यशक्ति आहे. परन्तु तिचा कशा युक्तीनें उपयोग करून घ्यावा हें समजलें पाहिजे. युक्ति म्हणजे यंत्र आणि यंत्र म्हणजे युक्ती. आज वाफेच्या शक्तीवर केवढालीं प्रचंड कार्यें करवून घेतलीं जातात; परंतु यंत्राशिवाय (युक्तीशिवाय) वाफेचा कांहींतरी उपयोग होईल काय ? तसेंच नामाचें आहे. नामांत अगाध शक्ती आहे पण तिचा योग्य उपयोग करून घेण्याची युक्ती समजली पाहिजे तरच अंतीम ध्येय मुक्ती पदरांत पडेल. थोड्या श्रमांत जास्त फायदा करून घेणें हेंच युक्तीचें काम आहे.

योगः कर्मसु कौशलम् ।

'**साई**' हा तारक मंत्र आहे. त्याच्यांत, वाचिक, उपांशु, मानस, ध्यान व अनन्य इतके प्रकार आहेत; तसेंच परा, पश्यन्ति, मध्यमा, वैखरी ह्या चार वाणी आहेत. विद्येचा

अभ्यास करकरून काव्यादि ग्रंथ रचणाऱ्या कवींच्या ग्रंथांतील शब्द हे अर्थांच्या मागें धावूं लागतात–शोध करतात. परंतु संतांच्या शब्दाकडे–त्यांच्या नांवाकडे अर्थ धांव घेत असतो.

जिवाला आनंदाची, सुखाची सारखी तळमळ लागली आहे. त्या आनंदाचा अनुभव जीव हरघडी विषयांतून का होईना (क्षणिक) घेत असतो. यावरून जीव आनंदकंद भगवंतापासून केव्हांही विभक्त नाहीं. त्याची ऐक्य प्रतीति केव्हांही हरवलेली नाहीं.

'साईकीर्ति' हीच नौका संसारीजनांच्या तरणोपायास मागें ठेवून 'श्री मुरलीधर साई भगवान्' निजधामास गेले. या नौकेंत बसण्यास सर्वांना अधिकार आहे.

सकळांसी येथें आहे अधिकार ।
कलीयुगीं उद्धार हरिच्या नामें ।।

'हरी' म्हणजे आनंद म्हणजेच ज्ञानानंद साई, साईभक्तांनीं 'साईलीला त्रैमासिक' हें साईकीर्तीचें सुकाणूं आहे. तरी आपण या नावेंत बसून 'साईकीर्ति' अर्थात आपल्याला आलेल्या आनंदमय साईलीलेच्या अनुभवाचें गायन करावें व त्या नादब्रह्माच्या गजरांत सर्वांनीं एकरूप 'साई' होऊन आनंद लुटावा एवढीच आपल्या संतश्रेष्ठ विभूतींच्या चरणीं ह्या अल्पमती दासाची नम्र विनंति आहे.

संपादक

---

# — साईप्रभाव —

श्री. रा. रा. डॉ. आण्णासाहेब गव्हाणकर यांसी

आम्हां उभयतांचें शिरसाष्टांग नमस्कार वि. वि.

पत्र लिहिणें कीं श्रीसाईबाबांच्या व आपल्या कृपेनें आम्हीं सर्वत्र मंडळी आजपर्यंत सुखरूप आहोंत. कळावें, विशेष आश्चर्यकारक व अवडीत गोष्ट कायसू बारदेश गोवा या मुक्कामीं घडली. व आमचे सासरे रा. रा. नाईक यांनीं ती मला कळविली. तरी त्यांच्याच शब्दांत आपणांस कळवीत आहें. तरी आपण श्रीसाईलीला या त्रैमासिकांत प्रसिद्ध कराल अशी आशा बाळगून विनंति करीत आहें. तसेंच श्रीसाईबाबांच्या भक्तवर्गानें श्रीबाबांवर पूर्ण विश्वासून चालावें ही सर्वांस नम्र विनंति आहे. कळावें

पत्र ता. २४–६–५१ चें आहे.

ता. क. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे आतांच सकाळीं ११ वाजतां समुद्रांत मासळी मिळविण्यास गेलेला एक मुलगा तीन तास समुद्रांत होडीला धरून गटांगळ्या खात होता. समुद्र खवळला होता; व पाण्यांत जाण्यास कोणीही धजत नव्हतें. वातमी माझ्या

कानांवर येतांच श्री बाबांवर पैंच टाकला. बाबांना म्हटलें, "बाबा, आपण ज्या स्थळांत आहांत तेथें, माझ्या कानावर अशुभ वार्ता येऊं नये. मुलाचें रक्षण करावें" व बाबांचें नांव घेऊन व बाबांचें मनांत नांव घेऊन विभूति फुंकली. चमत्कार काय सांगावा, पांच मिनिटांतच वारा अनुकूल वाहून मुलगा तडीस लागला किंवा बाबांचें सामर्थ्य बाबांचें भजन हेंच आमचें सर्वस्व.

श्रीबाबांचा चरणदास

**राजाराम—**

( २ )

पत्ता—पोलिस हेड क्वार्टर्स
मेहेसाणा,
व्हाया—अहमदाबाद
उत्तर गुजराथ.

श्री. रा. रा. संपादक

श्रीसाईलीला त्रैमासिक यांस.

सप्रेम नमस्कार वि. वि.

आपणांस दोन महिन्यापूर्वी एक पत्र लिहिलें होतें परंतु चुकीनें पोष्टाचें नांव शिरडी लिहिल्याकारणानें तें गहाळ झालें असें दिसतें. असो.

श्रीसाईबाबांचा अनुभव मला आला व प्रत्यक्ष चिंतन करावें त्यावेळीं श्रीसाईबाबा तेथें हजर राहतात. व भक्तांस वेळोवेळीं मदत करीत राहतात; त्याचा प्रत्यक्ष अनुभव मला आला.

मी बडोद्याच्या एका गृहस्थास बरावर १४०० रुपये सन १९४९ सालीं दिले होते. वास्तविक या गृहस्थास पूर्वी मी कधींही पाहिलें नव्हतें परंतु माझ्या कचेरींतील माझ्या हाताखालच्या कारकुनानें त्याची माझ्याजवळ शिफारस केली व कांहींही विचार न करतां मी त्यास रक्कम दिली. मासिक रु. २० च्या हप्त्यानें रक्कम चुकती करण्याचें ठरविलें होतें व त्याप्रमाणें दस्तऐवज लिहून घेतला. प्रथम प्रथम या गृहस्थानें दोन हप्ते मिळून एकंदर रु. ४५ मला दिले त्यानंतर मग तो उडाउडवीचीं उत्तरें करूं लागला व नंतर फरारी झाला. त्याचा तपास करतां तो अमदाबादेस गेल्याचें कळलें परंतु त्याचेसंबंधी लोकांजवळ तपास करतां कोणी त्याचा पत्ता देईना. असें करतां करतां दीड वर्ष होऊन गेलें व मला रक्कम सुरक्षितपणें मिळण्याची आशा राहिली नाहीं व कोर्टकचेरींत जाऊन खोटे धक्के खाण्याची पाळी येणार याची काळजी होतीच. ज्या घरावर रक्कम दिली होती तें घर कोठें आहे त्याचा तपास करतां घर अगदीं मोडकळीस आलेलें व तेथें आजुबाजूस वस्तीही चांगली नव्हती. तेव्हां या गोष्टीचा विचार करतां आपण योग्य विचारपूस न करतां अविचारानें रक्कम दिल्याबद्दल मनाला सारखी हुरहुर लागून राहिली. एके दिवशीं मेहसाण्यास माझ्या ओळखीच्या घरीं गेलों असतां तेथें श्रीसाईलीला पुस्तक पहाण्यास

मिळालें व श्रीसाईबाबांस मनांत प्रार्थना करून मला या कामीं मदत करण्यास विनंति व प्रार्थना केली. नंतर आठ दिवसांनीं बडोद्याच्या माझ्या एका मित्रानें मला कळविलें कीं, तो कर्ज घेणारा इसम बडोद्यास आला आहे व तो घर विकण्याच्या अगदीं तयारींत आहे. तरी आपण निघून यावें, असें कळतांच श्रीसाईबाबांचें स्मरण करून गाडींत बसलों व बडोद्यास आलों. ज्या इसमास कर्ज दिलें होतें त्यास भेटलों व त्यानें घर विकून कर्ज फेडण्यास कबुली दिली. त्याप्रमाणें त्याचें घरही ताबडतोब विकलें गेलें व मला व्याजासह १५०० रुपये मिळाले. याप्रमाणें सद्गुरु साईबाबांची कृपा झाली.

आपणांस योग्य वाटल्यास श्रीसाईलीला मासिकांत प्रसिद्ध करावें. वर कोणाचीं नांवें दिलेलीं नाहींत याचें कारण कीं कोणाचीहि अब्रू चव्हाट्यावर येऊं नये. याबद्दल माफी असावी.

आपला नम्र,

**रघुनाथ आनंदराव हर्डीकर.**

## " ॐ नमोश्री साई "

ता. १/जुलै १९५१

दत्तात्रय प्रभाकर लिखिते.

एक्साईज इन्स्पेक्टर ठाणें येथें असतां ता. १३।९।१९४८ रोजीं त्यांचेवर अँटी करपशन पोलिस खात्यानें लाच घेण्याची केस लावली. इन्स्पेक्टर लिखिते यानें पद्‌ राघो गुळवी, राहाणार खारी यानें गुन्हा केल्याबद्दल रीतसर कोर्टांत फिर्याद दाखल केली होती. ती दाखल केल्यावर तपास करणाऱ्या अंमलदाराच्या हातांत आरोपितास कोणत्याही प्रकारची मदत करतां येत नाहीं असें असूनसुद्धां पोलिसांनीं लिखिते लाच घेतील अशी फिर्याद दाखल झाल्यावर तिचा कायदेशीर तपास न करतां एकंदर चार वेळां लिखित्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. तीन वेळां गुन्हेगार पदूस पंचनामा करून पोलिसांनीं लिखित्यांना पैसे देण्यास दिले होते परंतु तिन्ही वेळां लिखित्यानें पैशाची मागणी केली नाहीं व पैसेही घेतले नाहींत असें कोर्टांत सिद्ध झालें. चौथ्यावेळीं लिखिते यांस डी. एस. पी. मिस्टर पौरी यांनीं **टेलिफोन** करून त्यांना आपल्या ऑफि-सांत कामाकरितां बोलावून घेतलें. डी. एस. पी. बरोबर चारपांच मिनिटें बोलणें झालें. नंतर त्यांना परत जाण्यास सांगितलें. ते घरीं परत जात असतां सदर पदु राघोबाच्याजवळ पोलिसांनीं पन्नास रुपये लिखित्यांना देण्यास दिले. तिन्ही वेळां पैसे न घेतल्यामुळें ह्या चौथ्या खेपेस पदूनें लिखिते हे गैरसावधपणें रस्त्यानें चालले असतांना कोर्टाचे नाक्यावर पदूनें त्यांचे खिशांत पन्नास रुपयांचे नोटांनें गोल केलेलें वेटाळें घातलें. एका सेकंदांत पोलिस ऑफिसर त्यांचे भोंवती गोळा झाले व त्यांचे हात पकडले. त्याचेकडे पन्नास रुपयांचे वेटोळें त्यांचे डाव्या बाजूचे शर्टाचे खिशांत मिळालें म्हणून त्यांना नोकरीवरून सस्पेंड करण्याचा हुकूम कमिशनर ऑफ एक्साईज मुंबई यांनीं ता. २९।९।४४ रोजीं हुकूम काढला व लिखिते यांचेवर इं. पी. कोड १६५ व प्री. ग्रुं. ऑफ आक्ट कलम ५ (१) ड प्रमाणें फिर्याद सरकारनें भरली. फिर्याद तारीख ३-१-१९५१ रोजीं ठाणें

येथील सेशन कोर्टात सुरू झाली. दरम्यान या वर्षाचें दीर्घ ससपेन्शनच्या काळांत कल्याण एथील मामा फडके यांची गांठ ठाणें येथें श्री. पेढणेकर यांचे येथें दसऱ्यास ठाणें येथें उत्सव होता तेथें श्री. फडके मामा यांनीं हकीगत ऐकून घेतली व साईबाबा आपले अरिष्ट–टाळतील व तुम्ही आठ दिवस पुढील गुरुवारपासून साईसत्‌चरित्र दाभोळकरकृत हें वाचा व सप्ता करून अवतरणीका आठव्या दिवशीं वाचा. त्या दिवशीं एक अथिति जेवण्याचीं पानें वाढिलीं असतांना [ लिखिते आगरखानांचे वाड्यांत जेथें राहतात ] तेथें आले. लिखीतेच्या मनांत बाबाचे रूपानें कोणी तरी येतील आपलेबरोबर जेवतील अशी भावना असल्यामुळें वाटच पाहत होते. सदर अथिति आल्याबरोबर त्यांना पाय धुण्यास पाणी दिलें व आपलेबरोबर पंक्तीस बसविलें. जेवणें झाल्यावर अथिति बुवांनीं पांढरे फडकें मागून घेतलें. अथिति जावयास निघाले त्यावेळीं सर्व मंडळी व पाहुणे मंडळी अथितीस निरोप देण्यासाठीं व्हरांड्यांत उभी असतां अथिति हे सदर बंगल्याचे चौथी पायरीवरून एकाएकीं अदृश्य झाले.

नंतर लिखिते १९४९ सालीं श्री. मामा फडक्यांचे बरोबर शिर्डीस गेले. पुन्हां १९५० सालीं मामा फडके म्हणाले, बाबांची पोथी परत वाचा. बाबा नक्की तुम्हाला ह्या संकटांतून वांचवितील. तुम्ही कांहीं काळजी करूं नका. तेव्हां पुन्हा पोथी वाचण्यास सुरवात केली. ह्याही वेळीं परत पुन्हा अथिति येऊन जेऊन गेले नंतर त्याचें केसचें काम लिखित्याचे विरुद्ध असलेली केस ता. ३।१।१९५१ रोजीं ठाणें एथील सेशन कोर्टांत सुरू झाली. मुंबई एथील सुप्रसिद्ध बॅरिस्टर श्री. विठ्ठल महादेव तारकुंडे यांनीं दहा दिवस बीन पैशानें येऊन न्याय मिळविण्यासाठीं केस चालविली व कोर्टानें लिखिते यांना पूर्ण निर्दोषी म्हणून ता. २२।१।१९५१ रोजीं सोडून दिलें. नंतर लिखिते तावडतोब शिर्डीस मुलांबाळांस घेऊन गेले व ता. २७–१–५१ रोजीं शिर्डीहून परत आले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ता. २८।२।१९५१ रोजीं डॉयरेक्टर आफ् प्रॉ० एक्साईज यांनीं रुजूं करून घेण्याचा हुकूम दिला. लिखित्यांचें ससपेंडमधील २॥ वर्षांचा पगार मिळावयाचा होता. सदर पगार बील चिफ् अकाउन्टंन ऑफिसर सो० यांजकडे पास होण्यास आलें होतें. कांहीं अडचणी निघाल्यामुळें सदर बील लिखिते यांना ता. ११।६। १९५१ रोजीं मिळण्यास अडचण झाली आहे असें समजल्यामुळें लिखिते यांनीं शनिवार ता. ९।६।५१ रोजीं आगगाडींतून ठाणें येथें मुंबईहून घरीं जातांना संकल्प केला कीं, ४८ तासांत बाबांची ५१ अध्यायांच्या पोथीचें पारायण करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें लिखित्यानें शनिवारीं रात्रौ ८ आठ वाजतां वाचण्याचें सुरूं करून रविवारीं रोजीं ८ आठ वाजतां पुरी केली व नंतर आरती वगैरे करून मित्रमंडळीस जेऊं घातलें. अथितीचें पान तयार ठेवलें होतें. अथितीच्याऐवजीं लिखिते यांचे वडील अथिति म्हणून एकाएकी बाहेर गांवाहून आले. नंतर सोमवारीं ऑफिसमध्यें गेले तर बील पास होण्याच्या ज्या अनेक विघ्न अडचणी निर्माण झाल्या होत्या त्याला कोणीच हरकत घेतली नाहीं व बील सुरळीत मिळालें. साहेब दुसरे दिवशीं सर्व ऑफिसर रागावलेले होते परंतु बाबांनीं स्वतःच सही करून बिल पास केले गेले होते.

रा. रा. संपादक " साईलीला " यांसी

Dr. K. B. Gavankar
Kala Chowki Road
Bombay No. 12

कृ. सा. न. वि. वि.

खालील मजकुरास श्री साईलीलेमध्ये सवडीनुसार प्रसिद्ध करणेची विनंती आहे.

कोटा ( राजस्थान ) येथील श्रीसद्‌गुरु साईबाबा गुरुपौर्णिमा उत्सव शके १८७३.

कोटा हें ठिकाण बी. बी. सी. आय् रेल्वेवर मुंबई–दिल्ली मेन लाईनवर आहे. गेल्या तीन वर्षांपासून येथें श्री साईबाबा भजनी मंडळ स्थापन झालें आहे व दिवसें दिवस भक्त मंडळी वाढतच आहेत. त्यामुळें इकडील भागांत श्री सद्‌गुरु साईबाबा यांची माहिती आतां सर्वत्र झाली आहे. आजपर्यंत येथील प्रत्येक उत्सवाची हकीकत मद्रास येथील साई–सुधा मासिकांत येत असे. कारण त्यांनीं विनंती केल्यावरून आम्ही त्यांच्याकडे नियमित येथील हकिकती पाठवीत असूं. यावर्षी गुरुपौर्णिमेचे सुमारास येथील श्री साई-बाबा भजनी मंडळाचे अध्यक्ष व श्रीसाईभक्त रा. रा. रा. बा. पिटकर ज्यावेळीं शिर्डीस गेले होते त्यावेळीं शिर्डी संस्थानचे अध्यक्ष व सभासद मंडळी यांनीं विनंती केल्यावरून आपणाकडेही यंदाच्या गुरुपौर्णिमेच्या उत्सवाची हकीकत साईलीला मासिकामध्यें प्रसिद्धी-करतां पाठवीत आहें व यापुढेंही आपली इच्छा असल्यास पुण्यतिथी व रामनवमी उत्सवाचेंही सविस्तर वर्णन आपणाकडे पाठवीत जाऊं.

श्री सद्‌गुरु साईबाबा यांचा गुरुपौर्णिमा उत्सव येथें ता. १७–७–५१ मंगळवार व १८–७–५१ बुधवार असे दोन दिवस साजरा झाला. सर्व भक्त मंडळींनीं आपले बाल-गोपाल मंडळीसह या उत्सवांत भाग घेतला होता.

मंगळवारीं दुपारीं १२ वाजतां श्रींची स्थापना पूजा व आरती व नंतर ७ प्रहर सतत " साईनाथ गुरु माझे आई मजला ठाव द्यावा पायीं " हे उभे राहून नामस्मरण. नामस्मरणांत सर्व स्त्रीपुरुषांनीं व बालगोपाल मंडळींनीं मोठ्या उत्साहानें भाग घेतला होता. श्रींची तसबीर मोगऱ्याचे फुलांनीं उत्कृष्ट रीतीनें शृंगारिली होती व जणुं काय बाबा साक्षात बसले आहेत असा भास होई. बुधवारीं सकाळीं ९ वाजता नामस्मरण समाप्ती व नंतर ९॥ ते १२ पर्यंत श्रींचे पादुकास रुद्राभिषेक महापूजा महा नैवेद्य आरती व मंत्रपुष्प दुपारीं ४ ते ५ श्री साईसत्चरित्र वाचन. रात्रौ ९॥ ते ११॥ ह. भ. प. अनंत केशव रानडे Bsc. रतलाम यांचे भक्त ध्रुवाचे आख्यानावर सुश्राव्य कीर्तन झालें. कीर्तनामध्यें अखंड नामस्मरणानें मनुष्याच्या वृत्तींत आपोआप कसा पालट होतो हें बुवांनीं अत्यंत उत्कृष्ट रीतीनें समजावून दिलें. रामनवमी व पुण्यतिथी उत्सवाप्रमाणें या वर्षाची गुरुपौर्णिमा ही श्रीसद्‌गुरू कृपेनें उत्कृष्ट रीतीनें पार पडली.

सदर भजनी मंडळ स्थापन झाल्यापासून आजपर्यंत श्री साईभक्त रा. रा. रा. बा पिटकर रिटायर्ड चिफक्लार्क डी. टी. एस आफिस यांनीं वेळोवेळीं जी मदत केली ः

आपल्या स्वतःचेच घरीं श्रीसाईबाबाचे तिन्ही उत्सव गेल्या तीन वर्षांपासून नियमित चालू ठेवले आहेत व त्याचप्रमाणें दर आठवड्यास दरगुरुवारीं भजनही सतत चालू ठेवलें आहे त्याबद्दल श्रीसद्गुरूमाऊलीचे चरणीं प्रार्थना कीं, त्यांना दीर्घायुष्य देऊन त्यांचेकडून अशीच सेवा घेऊन त्यांचेवर व त्यांचे सर्व कुटुंबियावर श्रींनी पूर्ण कृपादृष्टी ठेवावी— "

शिर्डी संस्थानास दुसरी विनंती कीं, ज्याप्रमाणें आम्हास मद्रासहून प्रत्येक उत्सवाचे कार्यक्रम व नंतर उदीप्रसाद आमचे भजन मंडळास येतात तसे आपणाकडूनही शिर्डी येथील उत्सवांचे कार्यक्रम व नंतर उदीप्रसाद पाठविणेची तसवीज व्हावी कळावे.

**पत्ता :** सेक्रेटरी श्रीसाईनाथ　　　　　　　　आ.
भजन मंडळ C/o.　　　　　　　　**वसंत विश्वनाथ जानवे**
**रा. रा. रामचंद्र बाळाजी पिटकर**　　　　　　सेक्रेटरी
रिटायर्ड चीफ क्लार्क P. O. KOTAHJN　　　　२२–७–५१

---

# श्री कोजगिरी–कथा—

॥ श्री गणेशायनमः ॥ कोणे एके दिवशीं ॥ ऋषी पुसती वालखिल्यासि ॥ सांग व्रतें कार्तिक मासीं ॥ जेणें जंतू सुखावती ॥ १ ॥ ऐकोनि वालखिल्य बोलत ॥ कोजागर नामें मुख्य व्रत ॥ त्यातें आचरतां प्रणत ॥ उत्तम लोकातें पावती ॥ २ ॥ आश्विन मासीं जे पौर्णिमा ॥ तेथें रात्रौ पुजिजे रमा ॥ ऐरावतसह इंद्र नामा ॥ नृत्य गीत जागरणें ॥ ३ ॥ द्यावीं दीप दानें बहुत ॥ लक्ष लक्षार्धचा अयुत ॥ सहस्र अथवा एकशत ॥ यथा शक्त्या घृत तैलें ॥ ४ ॥ तैसे ग्रामीं पथीं वनीं ॥ गृहीं आरामीं देवायतनीं ॥ दीप लावून विप्र भोजनीं ॥ तोषवावे क्षीरान्नें ॥ ५ ॥ उपवासी राहोनि आपण ॥ करावे नारिकेलोदक प्राशन ॥ रात्रौ करुनि जागरण ॥ अक्षक्रिडा करावी ॥ ६ ॥ मध्यरात्रीं समयीं कमला ॥ कोण जागृत असेल त्याला ॥ प्रसन्न होऊनि आपुला ॥ वित्तकोस समर्पी ॥ ७ ॥ याकारितां दरिद्रीयाणें ॥ हें व्रत कीजे अवश्यपणें ॥ या व्रताच्या सहजाचरणें ॥ वलितहि जाला धनवंत ॥ ८ ॥ हें ऐकोनि ऋषिवर ॥ म्हणती वालखिल्या सांग सत्वर ॥ वलित हा कोण थोर ॥ दरिद्री संपत्ति पावे कसा ॥ ९ ॥ बालखिल्य सांगती उत्तर ॥ वलित नामाविप्रवर पवित्र जाणता सदाचार ॥ मगध देशीं वसतसे ॥ १० ॥ याचना मरणासमान मानी ॥ देईल तितुकेंचि असे घेऊनी ॥ त्याची भार्या नामें चंडिनी ॥ सदा कलहा प्रवर्ते ॥ ११ ॥ म्हणे माझ्या सर्व बहिणी ॥ नानालंकारें सुवासिनी ॥ दिव्य माल्या देवांगणी ॥ श्रेष्ठ ऐशा शोभती ॥ १२ ॥ मेल्या दरिद्रा तुझ्या घरीं ॥ घेऊनि पडिल्यें मी पदरीं ॥ लज्जा वाटे मला थोरी ॥ लोकां मुख दाखवूं कसें ॥१३॥ जळो जळो रे तुझें घर ॥ निर्धनाचें कुळहें अवर ॥ ऐसें लोकींहीं वारंवार ॥ सांगोनि पति प्रिय न करिती ॥ १४ ॥ मग

संकल्प करी दारुण ॥ भर्ता करील जें निरुपण ॥ तें मी विपरित करीन ॥ लक्ष्मी पावे तोंवरी ॥ १५ ॥ ऐसा संकल्प करुनि मनीं ॥ मग ते विप्रास वदे कामिनी ॥ पाषाणवुद्धे नृपसदनीं ॥ चोरी करूनि धन आणी ॥ १६ ॥ न ऐकशी तरि तुज ताडीन ॥ ऐसें बोले कठोर वचन ॥ थरथरां कांपे तो ब्राह्मण ॥ काय करील बापुडा ॥ १७ ॥ क्षणेक ती रडे कपाळ ताडी ॥ एके दिवशीं उपास मांडी ॥ एके समयीं पारणें सोडी ॥ सर्वेहि मक्षी गृहांतील ॥ १८ ॥ पति मागे जरी पाणी ॥ धांवे घेऊनि केरसुणी ॥ तापऊनियां डहाणी ॥ डागावया धांवतसे ॥ १९ ॥ या प्रकारें कष्टवी ब्राह्मणा ॥ परि तो सोशी तिची यातना ॥ कांहीं न बोले अधिक वचना ॥ यथा लाभे संतुष्ट जो ॥२०॥ आर्याः॥ जिच्या शब्द-ध्वनिनें वीरिहि रण टाकिती करील पती ॥ ते स्त्री कलहा येतां वारणबे टाकिती करील पती ॥ ओं० ॥ तव एकदा श्राद्धतिथी ॥ पितृपक्षीं आली होती ॥ लक्षुनि तो महामति ॥ म्हणे आतां काय करूं ॥ २१ ॥ सामग्री कांहीं गृहीं असे ॥ परी श्राद्ध संपादे कैसें ॥ वदतां नये करितां ऐसें ॥ अनर्थ करील हे दुष्टा ॥ २२ ॥ ऐसा संकटीं पडिला ब्राह्मण ॥ भार्येस न वदे कांहीं भाषण ॥ तव एक मित्र त्याचा पूर्ण ॥ गणेश शर्मा पातला ॥ २३ ॥ त्याशींही पूर्वे वार्ता न वदे ॥ परी उद्विग्न पाहूनी तो वदे ॥ वलिता मज संकट कळों दे ॥ तुझी चिंता हरीन मी ॥ २४ ॥ ऐकोनि सांगे हळूच त्यास ॥ तो म्हणे उपाय असे यास ॥ कथितां विपरीतार्थास ॥ सुपरीत सहजें करील ही ॥ २५ ॥ ऐशी भार्या तुज असतां ॥ मग करिशी किमर्थ चिंता ॥ संसारी कामिनी यापरी मिळतां ॥ होशी कृतकृत्य धन्य तूं ॥ २६ ॥ ऐकोनि तुष्ट झाला द्विज ॥ भार्येप्रति बोले मग ॥ अनर्थ कारिके चंडी मज ॥ श्राद्ध करावें न वाटे ॥ २७ ॥ परवां येतसे श्राद्ध तिथी ॥ परी वडिलीं न जोडिलीं संपत्ति ॥ या कारणें माझी मति ॥ श्राद्धा विषयीं न वाटे ॥ २८ ॥ कदाचित तुला करणें ॥ तरि पाक अकाळीं सारणें ॥ कुत्सित विप्रां आमंत्रणें ॥ देऊनी कदान्नें अपावीं ॥ २९ ॥ एवं ऐकोनि पतिवचन ॥ आमंत्रिले श्रेष्ठ ब्राह्मण ॥ यथाकाळीं पाकसाधन ॥ करूनी म्हणे श्राद्ध करा ॥ ३० ॥ आर्याः ॥ ऐकोनि विप्र सुखावेत सौख्याला घडे तदानांत ॥ बोलुनि विपरीतार्थे संपादी श्राद्ध पिंड दानांत ॥ ३१ ॥ करूनी पिंड विसर्जन विस्मृतिनें विप्र तो वदे जाये ॥ हे पिंड नेऊनि तूं सत्वर गंगाजलांत दे जाये ॥ ३२ ॥ ओं० ॥ ते चंडीला दुष्ट दारा ॥ उचलोनि पिंड समुदाय सारा ॥ रोषें नेऊनि सत्वरा ॥ शौचकुपीं टाकीते ॥ ३३ ॥ पाहोनि वलित झाला दुःखी ॥ वचन न बोले कांहीं मुखीं ॥ क्रोधावेशें रुखरुखी ॥ निघता झाला गृहांतुनी ॥ ३४ ॥ संकल्प करी तो ब्राह्मण ॥ लक्ष्मी प्रसन्न झाल्याविण ॥ न करीन मी अन्नप्राशन ॥ फलाहारी वनीं वसे ॥ ३५ ॥ एवं संकल्प करुनी मनीं ॥ जाता झाला महत्काननीं ॥ फिरे वल्कलें नेसोनीं ॥ तव नदी तीर आढळलें ॥ ३६ ॥ तेथें राहिला दिवस वीस ॥ आश्विने पौर्णिमेचा जो दिवस ॥ कोजागर करणें ज्यास ॥ तोचि आला ते काळीं ॥ ३७ ॥ कालीय वंशा नागकन्या ॥ तिसरी तैशी सुलोचना ॥ ऐशा रूपवंती धन्या ॥ मिळोनि लक्ष्मीतें पूजिती ॥ ३८ ॥ सारुनि पूजा विधान ॥ द्यूत खेळों घालिती आसन ॥ चवथ्या पटीं

नाहीं कोण ॥ म्हणोनि वदथा शोधिती ॥ ३९ ॥ अकस्मात पाहिला द्विजवर ॥ अन्नाविणें झाला जर्जर ॥ भासे अस्थीचा पंजर ॥ खालावले नेत्रही ॥ ४० ॥ शुष्क मुख वल्कलधारी ॥ तपस्वी पोहोनी पुसती नारी ॥ भटजी येथें वनांतरीं ॥ किमर्थ बैसलां सांगावें ॥ ४१ ॥ ब्राह्मण वृत्तांत सांगे आपुला ॥ म्हणती द्यूत खेळों चला ॥ प्रसन्न होईल तुम्हां कमला ॥ सत्वर उठावें या समयीं ॥ ४२ ॥ विप्र म्हणे गे निश्चय ॥ द्यूतें वर्से लक्ष्मी नाश होय ॥ तुम्हीं म्हणतां पावे अक्षय ॥ केवीं घडे हें सांगा ॥ ४३ ॥ कन्या वदती बलिताशी ॥ विप्रा पंडिता समान वदसी ॥ मूर्खासारिखें कर्म करिसी ॥ हें अयोग्य तुज लागीं ॥ ४४ ॥ खेळतां सोंगटी अवश्य आजीं ॥ श्रीलक्ष्मी होतसे सत्वर राजी ॥ आम्हांसवें खेळोन भटजी ॥ कौतुक होय तें पहावें ॥ ४५ ॥ इतुकें वदोनि स्वगृहीं नेली ॥ नारी केलोदकादि देती ॥ मग खेळचा डाव टाकिती ॥ लक्ष्मी प्रीयतां म्हणोनी ॥ ४६ ॥ खेळतां खेळतां त्या अवसरीं ॥ डाव आला ब्राह्मणावरी ॥ नागकन्यांहीं ओढुनि करीं ॥ पंचा घेती भटजीचा ॥ ४७ ॥ ब्राह्मण कोपा बहु पेटला ॥ पुढतीं खेळावया बैसला ॥ तोंही डाव त्यावरी आला ॥ कौपिन घेती हिरोन ॥ ४८ ॥ क्रोधें धडके अग्नी तैसा ॥ म्हणे मागुतीं खेळों बैसा ॥ जरी मजवरी आला फांसा ॥ तरीं यज्ञोपवीत देईन मी ॥ ४९ ॥ बरें म्हणोनि खेळती ॥ तेव्हांही विप्रा जिंकिती ॥ यज्ञोपविता द्यावें म्हणती ॥ आतां काय उरलें गा ॥ ५० ॥ विप्र कोपें खवळला ॥ म्हणे खेळेन याची खेळा ॥ शरीर देईन एक वेळां ॥ मग दैवीं असेल तें घडो ॥ ५१ ॥ लक्ष्मी येते म्हणोन सांगती ॥ त्याची आली सध्यां प्रतीती ॥ मूर्ख संगें मूर्खमती ॥ मीही झालों नारायणा ॥ ५२ ॥ हे भगवंता कृपावंता ॥ काय केलेंस जगन्नाथा ॥ मज पावशी जरी अनाथा ॥ तरींच विश्वंभर नाम तुझें ॥ ५३ ॥ पृथ्वीवृत्त ॥ कुरोः सदसिते सती द्रुपदजा, स्मरे पायते ॥ तदा झडकरी तुवां पटहि अर्पिले आयते ॥ सुदाम पृथु भक्षणें बहुत तोष वाटे कसा ॥ दिलिस कनकावती मजचि लोभ आटे कसा ॥ ५४ ॥ श्लो० ॥ नेलें सर्वस्व माझें हरुनि नरहरे जागज्या कन्यकांहीं ॥ पूर्वीं स्त्रीत्यक्त आतां तुजविणें गा सुचे श्रीपते अन्य कांहीं ॥ दारिद्रें कष्टलोहीं कळवळ न तरी मच्छरीरा सुधातें ॥ त्याची चिच्छक्ति रामा नतरी विमल दे स्वानुकंपा सुधातें ॥ ५५ ॥ ओं० ॥ ऐसा विलाप करितां क्षणक्षण ॥ मध्यरात्रीं झाली पूर्ण ॥ तेव्हां श्रीलक्ष्मी नारायण ॥ येती लोकां पहावया ॥ ५६ ॥ उघडा यज्ञोपवित हीन ॥ विप्रा पाहोनि विवसन ॥ लक्ष्मीस वदे नारायण ॥ तुझा भक्त कां गे दरिद्री ॥५७॥ पण हा माझाही दास संत ॥ यातें करावें श्रीमंत ॥ मगते लक्ष्मी कृपावंत ॥ होऊनि पाहे द्विजाकडे ॥ ५८ ॥ भटजी झाले मदनासमान ॥ तेजें करोनि देदिप्यमान ॥ बाला म्हणती हा ब्राह्मण ॥ पति करावा आपुला ॥ ५९ ॥ नागकन्या मदनाकुला ॥ म्हणती आम्हीं विप्रा तुला ॥ जिंकितां करूं पति आपुला ॥ तूं जिंकितां करी इच्छिशी तें ॥ ६० ॥ विप्र मनीं विचार करी ॥ दोन्हीं यागें या किंकरी ॥ होती ऐसें निर्धारीं ॥ डाव टाकी खेळाचा ॥ ६१ ॥ जिंकिल्या तीनही चंद्रानना ॥ हर्ष झाला विप्राचिया मना ॥ होऊनी तात्काळ अंगना ॥ तिघी ओढिती तिन्हींकडे ॥ ६२ ॥ एक गळां मिठी घालिती ॥ एक

मुखातें चुंबिती ॥ एक म्हणे धरूनि हातीं ॥ माझा पति सोडावे ॥ ६३ ॥ वलित म्हणे होऊनी घाबरा ॥ अवध्याच तुम्हीं दारा ॥ परी येतां माझ्या घरा ॥ अन्न न मिळे भक्षा-वया ॥ सर्व सिद्धी येऊनी आम्हीं ॥ येतों तुमच्या आश्रमधामीं ॥ कृपा करूनियां स्वामी ॥ सेवा घ्यावी आमुची ॥ ६५ ॥ गंधर्व लग्न करूनी सत्वर ॥ स्त्रियांसह आला गृहावर ॥ चंडीनें पाहोनियां आदर ॥ केला बहु प्रकारें ॥ ६६ ॥ श्रीपतीची कृपा होतां ॥ सर्वही हरे क्षणांत चिंता ॥ कैवल्यपद येतसे हाता ॥ मग सिद्धीचें काय आश्चर्य ॥ ६७ ॥ यास्तव हें व्रत करोनि ॥ ब्राह्मण तर्पावे दक्षिणा–भोजनीं ॥ आपण पारणें सारूनीं ॥ वर्ततां लक्ष्मी प्रसन्न होय ॥ ६८ ॥ सर्व दुःखा होतसे नाश ॥ वालखिल्य सांगती ऋषिगणांस ॥ हे कथा एकाग्र मानस ॥ ऐकतां व्रत फल जन पावे ॥ ६९ ॥ ऐसी व्रत कथा गीर्वाग ॥ पाहोनि रचिलें आख्यान ॥ हें ऐकतां नारायण ॥ भक्तावरी दया करी ॥ ७० ॥ इति श्री कोजागरी कथा समाप्तः ॥

॥ श्री कृष्णार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

लिहिणार :–गोविंद विनायक नवरे, मुंबई.

---

# " गुरु–दक्षिणा "

श्रीगणेशायनमः श्रीसरस्वतेयनमः श्रीगुरुभ्योनमः श्रीपांडुरंगायनमः ॥ नमन माझें श्रीसाईनाथा ॥ जगदुद्धारक कृपावंता ॥ ज्यांच्या सामर्थ्यें लेखणी हाता ॥ धरिली ग्रंथ लिहावया ॥ १ ॥ पांडुरंग माझें ध्येयदैवत ॥ तयास माझा दंडवत ॥ जो न अपुल्या भक्तांस उपेक्षित ॥ लक्षित चरण मी त्याचे ॥ २ ॥ आतां सरस्वतीवाग्देवता ॥ प्रसन्न होई निजभक्तां ॥ शब्दसंपदेचे भांडार हाता ॥ पुरवी माते मजलागी ॥ ३ ॥ नमन माझें संतजना ॥ अपार प्रेमाच्या द्यावे दाना ॥ अंतःकरणांतील उत्कट भावना ॥ जागृत माझ्या कराव्या ॥ ४ ॥ आता मराठी मायबोली ॥ महाराष्ट्र संतांची शिकवण भली ॥ संतवाङ्मयांत जीने गोविली ॥ त्या मम भाषेस प्रणिपात ॥ ५ ॥ मराठी भाषेंतील ग्रंथकार ॥ संतचरित्राचे शिल्पकार ॥ आणि संतकाव्याचे अग्रेसर ॥ जनक दासगणूस नमन माझें ॥ ६ ॥ श्रीदासगणू माझी गुरु माऊली ॥ नमन माझें त्या पावलो– पाऊलीं ॥ प्रथमच ज्यांही लेखणी गिरविली ॥ गुरुदक्षिणेच्या मिषानें ॥ ७ ॥ दक्षिणा काय द्यावी गुरूस ॥ विचार पडला मम मनास ॥ तेंणें अंतरीं उदेली आस ॥ प्रस्तूत गुरुदक्षिणा लिहिण्याची ॥ ८ ॥ आपण गुरूस काय द्यावें ॥ ऐसे सहज ज्यां पुशिलें स्वभावें ॥ तंव गुरु बोलती मनची अर्पावें ॥ शिष्यानें गुरूस आपुलें ॥ ९ ॥ माझे गुरु नसती धनाचे ॥ किंवा ऐहिक सुखाचे ॥ मार्ग दाविती अमुच्या हिताचे ॥ निस्पृह सत्य स्वरूप केवळ ॥ १० ॥ अहा धन्य मी भाग्यवंता ॥ म्हणूनी पावलो चरणाप्रत ॥ श्रीदासगणूंच्या मी निश्चित ॥ जाहलो परमार्थ साधनीं ॥ ११ ॥ या ग्रंथाच्या वाचकास ॥ उद्देशून गुंफिलो पुष्पास ॥ ती सकलांस नेवो

उत्कर्षास ॥ हीच गुरुचरणाशीं प्रार्थना ॥ १२ ॥ विद्यार्थी कितीही शिकला सवरला ॥ तरी प्रश्न उपस्थित झाला, ॥ तूं कोणत्या पाठशाळेंत शिकला ॥ प्रशस्तीपत्र आहे कां ॥ १३ ॥ पाहून त्याची विद्वत्ता ॥ गुरु कोण म्हणून पुसे जनता ॥ केवढा आदर वाटे समस्तां ॥ गुरुविषयीं शिकवणीवरून ॥ १४ ॥ मग जे गुरु परमार्थ देती ॥ त्यांची केवढी वर्णावी महती ॥ जन्ममरणांतून सोडविती ॥ कर्मावरी मात करून ॥ १५ ॥ गुरु असे ब्रह्मदेव ॥ गुरु विष्णू महादेव ॥ गुरु प्रत्यक्ष सावयव ॥ परब्रह्मस्वरूप जाणावे ॥ १६ ॥ हें भाग्य असें अनुवादित ॥ गीर्वाण भाषेंत केले ग्रथित ॥ ज्याते प्रत्यही पठण करित ॥ जन समस्त एकसरें ॥ १७ ॥ एथें म्यां माझे काय सांगितलें ॥ ऐसे न म्हणावे मातें भले ॥ अर्थाकडे म्यां लक्ष वेधिलें ॥ ज्याते प्रत्यही स्मरता विसमरे मन ॥ १८ ॥ पात्रीं बैसता जेवावया ॥ तो काय विसरे सेवावया ॥ परी लक्ष वेधता अन्य ठाया ॥ क्षण एक विसरला पात्रास ॥ १९ ॥ तीच एक क्षणाची आठवण ॥ विसरवी मी आणि माझेपण ॥ सांडून गेला दुजेपण ॥ समरसला एकत्वामध्यें तो ॥ २० ॥ ज्ञानदेवांचे आपणा सांगणें ॥ जीवाभावाचे अंतरीं धरणें ॥ क्षण एक भगवंतास स्मरणें ॥ विसरून स्वतःस जगींया ॥ २१ ॥ परी हे न घडे गुरुविण ॥ आत्मिक सामर्थ्यावांचून ॥ गुरु न होतां आपणा प्रसन्न ॥ अवघे प्रयत्न निष्फळ ॥ २२ ॥ प्रयत्नें गुरुकृपा साधावी ॥ तेणें भक्तिवृक्षास फुटे पालवी ॥ कालांतरें फलभारें लववी ॥ वृक्षापरी विनम्र करून ॥ २३ ॥ रामकृष्ण पूर्णावतार ॥ अवतरले कराया जगदूद्धार ॥ तयांचेही गुरु वंद्य थोर ॥ वशिष्ठ सांदिपनी जाहले ॥ २४ ॥ संत नामदेव भक्तथोर ॥ विठ्ठलास जेवूं घाली साचार ॥ संभाषणही चाले वारंवार ॥ त्यासही गुरु करविला ॥ २५ ॥ ऐसें हें गुरुचें महिमान ॥ श्रीजगतीं जयांचे गुणागान ॥ श्रीपती करिती स्वयें आपण ॥ त्या म्यां पामरे काय वर्णावे ॥ २६ ॥ श्री दासगणूगुरु आत्मसाक्षात्कारी ॥ जयानी वरदहस्त ठेविला मम शिरीं ॥ आणि बोले तयांची वैखरी ॥ माझिया खाणींत हिरे प्रसवतील ॥ २७ ॥ नातरी माझें काय जगीं ॥ मी गारगोटीच जन्मलों वावुगी ॥ परि तीच लागता संतसमागमी ॥ तयांच्याच तेजे चमकेल ॥ २८ ॥ * मम गुरु बोलती स्वानुभवाचे बोल ॥ अनुमानाचे त्या न वाटे मोल ॥ तयांची आत्मज्ञानाची वाणी अमोल ॥ मार्गदर्शक झाली मजलागी ॥ २९ ॥ जी शिष्य–बोधाची अमृतवाणी ॥ श्रीदासगणूमुखें बोलला चक्रपाणी ॥ ती मी परिसता माझिया श्रवणी ॥ अंतरीं दीप प्रकाशला ॥ ३० ॥ * श्रीदासगणू माझी गुरुमाऊली ॥ विठाई मनुजरुपे अवतरली ॥ ही नसे अतिशयोक्तीची बोली ॥ येथें लेंकरू मातेस ओळखीतसे ॥ ३१ ॥ प्रथम व्हावें अगदीं लहान ॥ मग करावे निष्पाप मन ॥ तेणें तान्हुल्याचे स्वर्गीय जीवन ॥ उपभोगावें गुरुपदीं ॥ ३२ ॥ मम गुरुमाऊलीस फुटला पान्हा ॥ जवळीं घेतला अपुला तान्हा ॥ प्रेम वात्सल्य ओसंडे नयना ॥ पहावे ते मातृमुख एकदा ॥ ३३ ॥ मी गुरुस विनवि मातेपरी ॥ परिसावी मम बोबडी वैखरी ॥ प्रेम सुमनांची शिदोरी, तोषवो मानस आपुलें ॥ ३४ ॥ शिष्यबोधाची समर्थवाणी ॥ शिष्यरुपी हिऱ्यांच्या खाणी ॥ प्रसवेल धरिता अंतःकरणीं ॥ श्रद्धायुक्त अति आदरें ॥ ३५ ॥ येथें प्रत्यक्ष आहे प्रमाण ॥ पहा बोध

प्रभावपूर्ण ॥ मम अंतरास होता जाण ॥ प्रगटवील हृदय–शब्दांत ॥ ३६ ॥ नातरी माझी काय महती ॥ मी केरकचऱ्यासमान जगती ॥ हृदयीं प्रकाशवील पणती ॥ त्याच समर्थवाणीने ॥ ३७ ॥ तोच उपदेश बाणता मनीं ॥ कृतीनें आचरिता आपुल्या (क्रियाशून्य) जीवनी ॥ निर्जीव आयुष्यास संजिवनी ॥ लाभेल अमोलिक तात्काळ ॥ ३८ ॥ गुरूचे ठायीं गुरुत्वाकर्षण ॥ तेथांबवी शिष्यांचें भ्रमण ॥ लक्ष-चौऱ्यांशी योनींचे कालक्रमण ॥ घडवी न शिष्यास आपुल्या ॥ ३९ ॥ येथें बळकट असावा भाव ॥ कल्पनेस देऊं नये वाव ॥ मग गुरुशिष्याचा एकजीव ॥ द्वैत सांडोनी होईल ॥ ४० ॥ हाच माझा असे वारसा ॥ संकल्प विकल्प सारे निरसा ॥ माझ्या मनाचा स्वच्छ आरसा ॥ केवळ मज गुरुचरण दाखवो ॥ ४१ ॥ महाराज ही माझी गुरुदक्षिणा ॥ मी सप्रेम अर्पितों तवचरणा ॥ हा मम निर्धनाचा नजराणा ॥ भूषवो तव पदास समर्था ॥ ४२ ॥ आतां माझी एकच विनवण ॥ मम गरिबाची करावी आठवण जेणें माझें होईल कल्याण ॥ निर्वाण हरीपदीं होवो मम ॥ ४३ ॥ मी जन्मून जो या आलों जगतीं ॥ तो वाबुगा न जावो याचे पुढतीं ॥ जै मम सकळ कुळें उद्धरती ॥ तैं मी सार्थक्य पावलो ॥ ४४ ॥ मज ऐसे द्यावे आशिर्वचन ॥ जेणें होईल मम साधन ॥ जीवनाचे कांहीं नसतां ज्ञान ॥ जीवन उज्वल होवो मज ॥ ४५ ॥ माझिया बोलांचे पुरवा कोड ॥ अपुल्या चरणांची द्यावी जोड ॥ नलगो अन्यथा कांहीं गोड ॥ तव निदिध्यासावांचून ॥ ४६ ॥ माझ्या मनीं जें जें स्फुरले ॥ तें तें लेखनद्वारा उमटले ॥ नामरूपास नाहीं भुलले ॥ लौकिकीं गुरु प्रभाव मानावा ॥ ४७ ॥ सर्वांतर्यामी जो नारायण ॥ तयाचा मी पाईक असें जाण ॥ जयानें बोलविला हा पाषाण ॥ पडलेला उजाड माळावरी ॥ ४८ ॥ या पाषाणाचा झाला उत्कर्ष, श्रीदासगणूंचा होतां चरणस्पर्श ॥ ग्रंथाचा काढावा निष्कर्ष ॥ पाषाणवाणी परिसता ॥ ४९ ॥ येथें मजलागी ज्ञानाभाव ॥ अंतरीं गुरुभक्तिचा प्रभाव ॥ पाषाणांतुनी बोले देव ॥ तो पांडुरंग स्वयें आपण ॥ ५० ॥ तेथें कर्ता कर्म क्रियापद ॥ किंवा काव्यरसाचा मकरंद ॥ नटला अवघा तो परमानंद ॥ इंद्रियें आधीन जयाच्या ॥ ५१ ॥ कर्ता कोण कर्म काय ॥ क्रिया कसली काय होय ॥ हें जंव कळे तंव संभ्रम जाय ॥ फिटोन जन्मांतरीचा ५२ ॥ तेथें शब्दास नाहीं वाव ॥ मग अर्थास आला कैंचा ठाव ॥ एकैच एक अवघा भाव ॥ तें मौन शेवटीं वाचेला ॥ जे न चाले अथवा बोले ॥ जे स्थिर ठांईंच अचुले ॥ ते वर्णीता वर्णीता थकले ॥ वेदविद्याविशारद ॥ ५४ ॥ ऐसे जे ब्रह्म निराकार ॥ तयास करविले साकार ॥ केवळ भक्तीनें अपुल्या थोर ॥ साधूसंतादिकांनी ॥ ५५ ॥ तयास दिधलें नामाभिधान ॥ आपआपुल्यापरी कराया गान ॥ भक्तिरसानें ओथंबून ॥ तो अमुचा विठ्ठल सांवळा ॥ ५६ ॥ नामा बोले वैकुंठनायका ॥ गुरु किमर्थ धरावा फुका ॥ केवळ ओळखण्या जगत्पालका ॥ तो तूं मजशी बोलतसे ॥ ५७ ॥ तंव देव बोलले लाडक्या नामा ॥ त्वां न ओळखिले मेघश्यामा ॥ तयाच्या रूपा अथवा नामा ॥ अमर्याद विराट स्वरूपा ॥ ५८ ॥ पार्थासी झाले विश्वदर्शन ॥ अमायिक ब्रह्माचे करविलें ज्ञान ॥ तो हा पांडुरंग जगज्जीवन ॥ उपदेशी गुरु करावया ॥ ५९ ॥

मग त्याने वंदिला गुरुवर ॥ प्रसन्न झाला राधारमण ॥ त्यास पटली ब्रह्माची खूण ॥ केवढा अधिकार गुरुचा ॥ ६० ॥ जगामध्यें असती अनेक गुरु ॥ परी परमार्थ मार्गीचा तो सद्गुरु ॥ तयांचे स्वाधीन करावा मनाचा वारु ॥ तेणें अस्थिरपणा हरपेल ॥ ६१ ॥ दृढ श्रद्धा असावी गुरुपदीं ॥ मन तेथेंच लागे भावसमाधी ॥ तेणें हळूहळू सुटतील उपाधी ॥ कामक्रोधादिषड्रिपूंच्या ॥ ६२ ॥ षड्रिपूंची बसली आपणा पकड ॥ आत्मा सुटावयाची करितो धडपड ॥ षड्रिपू मारिती त्याला थप्पड ॥ मग तो व्याकुळ होई स्वस्थानी ॥ ६३ ॥ येणें परी आत्मा होतां अगतिक ॥ अपुल्या गुरूस मारी हांक ॥ गुरु सदैव जागरूक ॥ सवा-गेंवी शिष्यास तारावया ॥ ६४ ॥ तरी आपण अवघेजन ॥ अपुल्या गुरूस जावूं शरण ॥ बंधमुक्त करावे सारेजण ॥ ऐसे विनवूं तयांना ॥ ६५ ॥ आपणा सर्वांस लागो तळ-मळ ॥ हरिभजनाची सांजसकाळ ॥ कोठें कसाही मिळता वेळ ॥ चिंतन प्रभूचे घडावें ॥ ६६ ॥ मानवांचें मन हें बंडखोर ॥ तें न होई कदा स्थिर ॥ या शत्रूस जिंकणें अनिवार ॥ सोपें न वाटते तितुकें हे ॥ ६७ ॥ तें मनची करावे त्वां अपुले ॥ मग मला शत्रूच नुरले ॥ पांडुरंगा तव शक्तिबळें ॥ हे मम मागणे मानावे ॥ ६८ ॥ भक्तीवैराग्य आणि ज्ञान ॥ परमार्थाचें मुख्य साधन ॥ ते त्वां करावें निर्माण ॥ भक्ताठायीं आपुल्या ॥ ६९ ॥ मी समर्थांच्या घरचा श्वान ॥ त्या माझा धरावा अभिमान ॥ वेडेवांकडे करितो गान ॥ तव द्वाराशीं माधवा ॥ ७० ॥ त्वां नकरावें हडहड ॥ ऐकून बाष्कळ बडबड ॥ मानून घे प्रेमाची ओरड ॥ स्वरज्ञानावांचून केलेली ॥ ५१ ॥ आतां जो मी आलो येथवरी ॥ त्या मशी लोटी न माघारीं ॥ नातरी तुझी काय थोरी ॥ जगदुद्धारक कैसा तूं ॥ ७२ ॥ गुरूनें मज केले वारकरी ॥ आणून सोडिलें तुझिया द्वारीं ॥ तो काय लोळूं उकिरड्यावरी ॥ तें तव श्रीदास न शोभे ॥ ७२ ॥ इतुक्यानें माझें नाहीं झालें ॥ माझ्या समवेत जे जे पातले ॥ त्यां सर्वांस तूं आश्रित केले ॥ पाहिजे विठ्ठला आपुले ॥ ७४ ॥ देवा तव भक्तांना ऐहीक सूख ॥ द्यावें त्वां तव पाहता मुख ॥ काया मनें निरोगी राख ॥ तव भजनप्रेमे करावया ॥ ७५ ॥ शरीरीं नसता त्यांच्या जोम ॥ कैसा चालावा त्यांचा नेम ॥ दुर्बळ मनाचें कसलें प्रेम ॥ लेचींपेचीं भक्तीती ॥ ७६ ॥ या सर्वांस करी वैभवसंपन्न ॥ राष्ट्रही झालें हीनदीन ॥ दिसेल कां ते गोकुळवृंदावन ॥ काळाच्या उदरांत दडलेले ॥ ७७ ॥ पुन्हां वाजेल कां रे बांसरी ॥ मंत्रमुग्ध सारी नगरी ॥ जी एकदां त्वां केली हरी ॥ ती काय तूं रे विसरला ॥ ७८ ॥ कोठें गेले ते गवळीवाडे ॥ कुठें उडाली त्यांची कवाडे ॥ केवळ आम्ही गातो पवाडे ॥ शतकानुशतकें आव पूर्णा ॥ ७९ ॥ देवाही सारी तुझीच माया ॥ आज दिसे ते उद्यां न ठाया ॥ परि स्थिर उभा तूं पंढरीराया ॥ युगानुयुगे विटेवरी ॥ ८० ॥ त्वां अनंत ब्रह्मांडें प्रसविली ॥ तैशीच ती आत्मसात केली ॥ मायाच सर्वत्र विस्तारली ॥ तंव इच्छामात्रें करून ॥ ८१ ॥ तंव इच्छेनें जग हें चाले ॥ तव सत्तेनें मज बोलविले ॥ नकळे मजला काय केले ॥ मी निष्क्रिय सर्वथा तुझ्याविण ॥ ८२ ॥ तुज वाटले म्यां बोलावे ॥ ते मम गुरुने परिसावे ॥ इतुकेंच मजला झाले ठावें ॥ ज्ञान अज्ञानविर-

हित ॥ ८३ ॥ प्रत्यक्ष घडवी गुरुसेवा ॥ ऐसें वाटलें माझीया जीवा ॥ हा संकेत कैसा पुरा व्हावा ॥ असता परिस्थिती प्रतिकूल ॥ ८४ ॥ तरी माझिया लेखनद्वारें ॥ सेवा व्रताच्या निर्धारें ॥ शब्दसुमनरुपी मोगरे ॥ उधळितों चरणावरी सद्गुरुंच्या ॥ ८५ ॥ ती पावन होवोत चरणावरी ॥ मग त्या निर्माल्यांची मातब्बरी ॥ जे हाती घेतील तयांचे करीं ॥ सहजासहजी होईल ॥ ८६ ॥ येथें माझें कांहीं न साना ॥ न होवो निर्माल्याची अवहेलना ॥ तुम्ही बुधजन हुंगा त्यांना ॥ गुरुप्रसाद मानुनी ॥ ८७ ॥ शके अठराशेंत्र्याहत्तर ॥ चैत्र कृष्णपक्ष गुरुवार ॥ ग्रंथ लिहविला साचार ॥ सच्चिदानंद साईनाथें ॥ ८८ ॥ श्रीसाईनाथ सद्गुरु कैलासनाथ ॥ जयाने पूर्ण केला ग्रंथ ॥ गुरुदक्षिणा नामे संक्षिप्त ॥ लिहवून कृतार्थ मज केले ॥ ८९ ॥ जया मनीं घडावी गुरुसेवा ॥ तयाने हा ग्रंथ वाचावा ॥ गुरुवारीं अति आदरें भावा ॥ कल्याणप्रद मग होईल सकलिका ॥ ९० ॥ वामनात्मज घाली लोटांगण ॥ श्रीदास-गणूंच्या चरणीं भावपूर्ण ॥ ग्रंथास केले कृष्णार्पण ॥ गुरुपदयुग्मास लक्षुनी ॥ ९१ ॥ स्वस्ती श्रीवामनात्मज विरचित ॥ गुरुदक्षिणा नामेंग्रंथ ॥ तारक होवो अवघ्यांप्रत ॥ श्रीविठ्ठलाच्या कृपेनें ॥ ९२ ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु शुभं भवतु.

वसंत वामन प्रधान

---

# शिरडी क्षेत्रांत

## माहे सन १९५१

या महिन्यांत श्रीसाईबाबाचे दर्शनास बाहेर गांवचे बरेच भक्त येऊन गेले. शिवाय रजेचा महिना असल्यामुळें इतर दिवसांपेक्षां बरीच गर्दी दिसत होती.

**देणगीः**—५३ श्रीसाई भक्तांकडून श्रीसाठीं निरनिराळ्या प्रकारचे कपडे गलेफ, सोने–चांदी व पितळीचे जिन्नस देणगी दाखल आले.

**धर्मकृत्यः**—भक्तांतर्फे संस्थानकडून श्रीस अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन व अन्नदान वगैरे विधी दररोज यथासांग पार पडले.

**कीर्तनः**—संस्थान गवई यांचीं चैत्रवद्य ११, श्रीसंत भाऊ कुमार पुण्यतिथि, अक्कलकोटस्वामी पुण्यतिथि, श्री परशुराम जयंती; वैशाख शु०॥ ११ श्री नरसिंहजयंती, वैशाख वद्य ११ अशीं ७ कीर्तनें समाधी मंदिरांत झालीं.

**नवलविशेषः**—संस्थान ऑफीसची नवीन जागा बांधून तयार झाली त्या जागेंत मॅनेजर यांचें ऑफीस नुकतेच गेलें आहे. पूर्वी कमिटीची मिटिंग दीक्षित वाड्यांत भरत असे पण आतां सभामंडपाच्या वर नवीन हॉल बांधल्यामुळें ता. २७ ची कमिटीची मिटिंग त्या नवीन हॉलमध्यें भरली होती.

खालील कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती येणेंप्रमाणें–

नांव—

श्री. दत्तात्रय नारायण नाडकर्णी श्रीदत्तसंगीत विद्यालय, मुंबई.........गायन

श्री. शैलनेरूर मुंबई.......................संगीत भजन

कु० के. एस्. सरोजा व कु० के. एस्. वनाजा-संगीत भजन व नृत्य.

श्री. वेणुबाई शिर्डी

श्री. गुलाबबाई, संगमनेर
श्री. साखरबाई, घोडेगांव
श्री. बेबीबाई, घोडेगांव
श्री. नाथा कुळे, पुणें
श्री. बबनराव व श्री. दत्तोपंत
} संगीत गायन व भजन

श्री. अण्णा क्षीरसागर येवलें.....................गायन

श्री. कुमुदिनी पेडणेकर पुणें.......................गायन व भजन

श्री. शामला माजगांवकर
श्री. हिराबाई जव्हेरी
श्री. इंदूमति चौबळ, मुंबई
} संगीत गायन व भजन

श्री. मधुबाला जव्हेरी
श्री. सीता जव्हेरी
} संगीत भजन

श्री. लोकमान्य संगीत भजन मंडळी, संगमनेर—भजन

श्री. अनिल कुमार मोहिले व
श्री. जगन्नाथ मोहिले
} सारंगी व मुरली वादन

सभामंडपाचें बांधकाम चालू असून दरवाजे, प्रवेश कमान, स्टेजफरशी, कमिटी हॉल व मॅनेजर यांचे ऑफिस वगैरे बांधकाम पूर्ण झालें.

शिरडी येथील हवापाणी उत्तम आहे.

## माहे जून १९५१

या महिन्यांत बाहेरगांवचे बरेच भक्त श्रींच्या दर्शनास येऊन गेले.

**देणगीः**—श्रींच्या २५ भक्तांकडून निरनिराळ्या प्रकारचे कपडे, गेलफ, सोन्या-चांदीचे व पितळेचे जिन्नस श्रींसाठीं देणगीदाखल आले. त्यांत विशेष म्हणजे कोणी तरी एका भक्तानें ६ सोन्यांचीं बटणें (वजन सुमारें १ तोळा) समाधी मंदिर पेटींत टाकलेलीं होतीं.

**धर्मकृत्यः**—श्रीभक्तांचे संस्थानतर्फे, अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन, अन्नदान वगैरे विधि दररोज यथासांग केले गेले. आठ भक्तांच्या समाधीमंदिरांत श्रीसत्यनाराणाच्या पुजा झाल्या.

**कीर्तनः**—संस्थान गवई यांचीं या महिन्यांत ज्येष्ठ शु०॥ ११ व ज्येष्ठ व०॥ ११ अशीं २ कीर्तनें समाधीमंदिरांत झालीं.

**नवलविशेषः**—खालील भक्तांनीं श्रीपुढें हजेरी दिली.

सौ. गोदूबाई लक्ष्मण देशपांडे ( कोटा ) संगीत भजन

श्री. पिरोजबाई दस्तुर, मुंबई............... गायन

श्री. पंढित भाग्यरेड्डी भोलाराम............ भजन व गायन

श्री. पंडित जगन्नाथबुवा सुरतकर...... ...... गायन व भजन

श्री. रणछोडभाई सुरतकर............... गायन व हार्मोनियम वादन

श्री. रामप्रसादजी..................... गायन

भोजनगृहाचें बांधकाम व इतर दुरुस्तीचीं कामें तसेंच फरशी बसविणें व सभामंडपास रंगरंगोटी करणें इत्यादि कामें चालू आहेत.

श्री. द. दा. उर्फ नानासाहेब रासनें, पुणें ( संस्थान ट्रस्टी ) यांचा मुक्काम सध्यां शिरडींत असून रोज सवड मिळेल त्याप्रमाणें कवाली व भजन यांच्या गायनानें देवाची सेवा करीत आहेत. एखादे वेळेस कीर्तनही करून देवाचें व लोकांचे मनोरंजन करण्याचें कार्य उत्तम प्रकारें पार पाडतात. शिवाय संस्थानच्या बांधकामाची कसोशीनें पहाणी करून इतर ठिकाणीं देखरेखही करतात.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

---

## माहे जुलै १९५१

बाहेरगांवचे बरेच भक्त या महिन्यांत श्रींच्या दर्शनास येऊन गेले. श्रीगुरुपौर्णिमा उत्सव याच महिन्यांत झाला.

**देणगीः**—एकंदर ३० भक्तांनीं कपडे, गलेफ सोने–चांदी व पितळेचे जिन्नस श्रीसाठीं देणगीदाखल दिले. त्यांत विशेष समाधी मंदिरपेटींत सोन्याचा छेडा व फणी वजन अदमासें ७ आणे भार मिळालीं. श्री. के. सी. अयप्पा, द्रोणाचलम यांनीं ९३ तोळे वजनाचें चांदीचें ताट अर्पण केलें. श्री. नागरत्नम् गुंटकल यांनीं अकरा आणे भार वजनाचें सोन्याचें श्रीसाईबाबांचें लाकेट अर्पण केलें.

**धर्मकृत्यः**—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, आरती, ब्राह्मण सुवासिनी भोजन व अन्नदान वगैरे भक्तांचे विधि संस्थानतर्फे रोज करण्यांत येत होते. या महिन्यांत ५ भक्तांनीं सत्यनारायणाच्या पूजा श्रीमंदिरांत बांधल्या.

**कीर्तनः**—संस्थान गवई यांची या महिन्यांत आषाढ शुद्ध ११ कालाकीर्तन, आषाढ वद्य ११, श्री. नामदेव पुण्यतिथि अशीं ४ कीर्तनें झालीं. बाहेर गांवचे कीर्तनकार श्री. ह. भ. प. भास्करबुवा नाशिक यांचें कीर्तन झालें.

**नवल विशेषः**—खालील भक्तगणानें आपली हजेरी श्रीपुढें लाविली.

नांवः—

श्री. जगन्नाथबुवा सुरतकर.................................गायन

श्री. आर. के. पाध्ये. अहमदनगर...........................गायन हजेरी.

| | |
|---|---|
| श्री. बेबीप्रसाद<br>श्री. संपतलाल<br>श्री. दीनानाथ<br>श्री. जगदीशप्रसाद<br>श्री. नागप्पा<br>श्री. बद्रीप्रसाद | नागपूर. या गटानें गायन, भजन, नृत्य, तबलावादन, हार्मोनियम वादन यांची हजेरी दिली. |

श्री. मधुसूदन गोविंद नाशिककर, धुळें......गायन व भजन

श्री. नानासाहेब रासनें. संस्थान ट्रस्टी हे श्रीपुढें सवडीप्रमाणें संगीत भजन व कवाल्या म्हणून हजेरी लावीत असतात; व संस्थानची देखरेख करितात.

**सभामंडप**—बांधकाम पूर्ण होऊन रंगाचें व फरशी बसविण्याचें काम पूर्ण झालें आहे. समाधीमंदिरास विशेष शोभा येत आहे. त्याचप्रमाणें भोजनगृहाचे मागील बाजूस लोखंडी कैंच्या व सिमेंटचे पत्रे घालण्याचें काम पूर्ण झालें आहे.

येथील हवापाणी उत्तम आहे.

---

## गुरुपौर्णिमा उत्सव

श्रीसाईनाथ महाराजांचा गुरुपौर्णिमा उत्सव मिति आषाढ शु०॥ १४ शके १८७३ रोज मंगळवार ता. १७—७—५१ पासून सुरू होऊन आषाढ व०॥ १ रोज गुरुवार ता. १९—७—५१ रोजीं दुपारीं काला कीर्तन होऊन समाप्त झाला.

या उत्सवास चालू सालीं मुंबई, पुणें, ठाणें, नाशिक, नगर, सिकंदराबाद, मद्रास, म्हैसूर, बँगलोर व इतर अनेक ठिकाणांहून बरेच भक्त लोक श्रीदर्शनास आले होते.

**उत्सवाचा कार्यक्रमः**—नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त **मंगळवार ता. १७-७-५१ रोजीं रात्रौ** श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक काढण्यांत आली. मिरवणूक प्रसंगीं भजन, बँड यांचे ताफे चाललेले होते. पालखी मंदिरांत आल्यावर कीर्तन, गायन भजन, वगैरे कार्यक्रम झाले.

**बुधवार ता. १८—७—५१.** आषाढ शु०॥ १५ या दिवशीं श्रींचे समाधीस भक्तांकडून अभिषेक, अर्चन, पूजा, लघुरुद्र वगैरे धर्मकृत्यें बरींच झालीं. नंतर श्रीसमाधीस भक्तांकडून पंचामृतानें मंगलस्नान घालण्यांत आलें. त्यानंतर वस्त्रार्पण, पुष्पार्पण व फलार्पण वगैरे विधीपूर्वक करण्यांत आले. नंतर माध्यान्ह—आरती होऊन तीर्थप्रसाद वांटण्यांत आला. दुपारीं ३॥ ते ५॥ पर्यंत श्री. ह. भ. प. गोपिचंद्र बुवा बोरकर यांचें

कीर्तन झालें. कीर्तन संपल्यानंतर कार्यक्रम पत्रिकेंत प्रसिद्ध केल्याप्रमाणें संध्याकाळीं श्रींच्या कपड्यांची लीलांव-विक्री करण्यांत आली. रात्रीं श्रींचे रथाची गांवांतून मिरवणूक काढण्यांत आली. मिरवणुकीच्यावेळीं इतर भक्तगणांबरोबर संस्थान नोकरांनींही भाग घेतला होता. व त्यांनीं जमलेल्या भक्तगणांचें नकलांचा कार्यक्रम करून उत्तमप्रकारें मनोरंजन केलें. त्या रात्रभर जागर करण्यांत आला. त्यावेळीं खालील कलावंतांनीं श्रींपुढें हजेरी देऊन जमलेल्या भक्तांचें चांगलें मनोरंजन केलें.

नांव.

| | |
|---|---|
| श्री. श्रीपाद गोविंद नेवरेकर........ | गायन |
| श्री. इनामदार ... .......... ... | गायन |
| श्री. बापूराव माने ... ... ... ... ... | गायन |
| श्री. हरिभाऊ ... ... ... ... ...... | गायन |
| श्री. रघुनाथ तात्याबा मोरे........ | तबलावादन |

वरील गंधर्व नाटक मंडळींतील कलावतांनीं कार्यक्रमांत भाग घेतला होता.

श्री. अनिल कुमार मोहिले या लहान मुलानें काचतरंग व तबलावादन फार उत्तम केलें.

| | |
|---|---|
| श्री. जगन्नाथ मोहिले ... ... ... ... ... | बासरीवादन |
| श्री. द्वारकानाथ जगताप, पुणतांबे ... ... ......... | गायन |
| श्री. नारायणराव जोग, मुंबई... ........... | गायन |
| श्री. मनोहर विठ्ठल पनवेलकर ... ...... ... ... | सनईवादन |
| श्री. शंकर बाबुराव देवळणकर, पुणें........... | सनईवादन |
| श्री. दत्तात्रय अहिलाजी ........... | सनईवादन |
| श्री. दामुअण्णा बेलापूरकर ...... ... ... | ” |
| श्री. शंकरराव नगरकर ........... | ” |
| श्री. रामराव ........... | ” |
| श्री. राजाराम देशपांडे, पुणें ... ... ...... | हार्मोनियम वादन |
| श्री. लाला गंगावनें ... ........ | तबलावादन |
| श्री. दत्तोपंत, श्री. रंगनाथ ........... | ” |
| श्री. शंकर स्वामी, पुणें ............ | कीर्तन |

गुरुवार ता. १९-७-५१ रोजीं नवीन तयार झालेल्या भव्य सभामंडपांत संस्थान गवई श्री. विठ्ठलराव यांचें उत्सावाचे काला कीर्तन झाल्यावर हंडी फोडण्याचा कार्यक्रम होऊन

उत्सव समाप्त झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. त्याच दिवशीं रात्रीं पी. नारायणराव या मद्रासी भक्तानें श्री साईबाबांचे चरित्रावर इंग्रजींत सुश्राव्य व्याख्यान दिलें. गुरुवारीं रात्रौ चावडीची मिरवणूक झाली. अशा रीतीनें हा उत्सव श्रीकृपेनें उत्तम प्रकारें व आनंदांत झाला याबद्दल शंकाच नाहीं.

सेक्रेटरी
श्री साई संस्थान शिरडी.

---

## विनंति

वर्गणीदारांनीं आपापली वर्गणी (सन १९५१ ची) मॅनेजर श्रीसाई संस्थान शिरडी, जि. अहमदनगर या पत्त्यावर पाठवावी.

संपादक

# श्री साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री साई सच्चरित्र ( मराठी ) .... .... | ७ | ० | ० |
| २ | सच्चरित्र ( इंग्रजी ) .... .... | ४ | ० | ० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी .... | ० | २ | ० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] .... | ० | ८ | ० |
| ५ | सगुणोपासना .... .... .... | ० | ३ | ० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक ( इंग्रजी ) .... .... | १ | ४ | ० |

वरील पुस्तकांकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळ्या साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

मॅनेजर, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. रहाते, जि. **अहमदनगर**
खजिनदार, त्रि. शा. **कीर्तिकर**, २१२, धन बिल्डिंग, चर्नीरोड, मुंबई नं. ४

---

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादक :–**डॉ. के. भ. गव्हाणकर** यांनीं, काळाचौकी रोड,
मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.
मुद्रक :–**के. एन्. सापळे**, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, ज्युडेक्स बिल्डिंग,
त्रिभुवन रोड, **मुंबई ४**